आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१८ मे २०२४ - शनिवार

लोकसभा निवडणुकीच्या राज्यातल्या शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराची आज सांगता होत आहे. राज्यात उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ जागांवर परवा मतदान होणार आहे.या टप्प्यातल्या मतदानासाठी २४ हजार ५७९ मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत. राज्यातल्या १३ मतदारसंघांत दोन कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत, तर २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

<><><><><>

UPA सरकारच्या काळात देशात अन्न सुरक्षा कायदा आणला आहे. पुन्हा सत्तेत आल्यावर १० किलो धान्य मोफत देऊ आणि GST चा एकच दर लागू करू, असं आश्वासन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज मुंबईत इंडीया आघाडीच्या वार्ताहर परिषदेत दिलं. राज्यातल्या ४८ पैकी सुमारे ४६ जागा महाविकास आघाडीला मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातल्या सर्व जातधर्माच्या सर्व संस्था आणि वास्तूंचा सन्मान आमच सरकार करेल असं शरद पवार यांनी यावेळी सांगितलं. तर अयोध्येतील राम मंदिराच बांधकाम अपूर्ण असून आम्ही सत्तेत आल्यानंतर ते पूर्ण करू असं उद्धव ठाकरे म्हणाले. ४ जून पासून या देशात इंडिया आघाडीचे सरकार येईल आणि खऱ्या अर्थाने अच्छेदिन सुरू होतील, असंही ठाकरे म्हणाले.

<><><><><>

मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक पहिल्या टप्प्यातील जमीन देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले. प्रकल्पासाठी नियोजित संपूर्ण ९ पूर्णांक ६४ शतांश एकर जमीन हस्तांतरित करण्यासाठी राज्य सरकारला डिसेंबर २०२४ पर्यंत वाट पाहण्याची आवश्यकता नसल्याचं सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला यांच्या खंडपीठानं स्पष्ट केलं.

<><><><><>

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आज नालासोपारा इथं जनसभेला संबोधित करणार आहेत. थोड्याच वेळात त्यांच्या सभेला सुरूवात होत आहे.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यातला कांद्याचा प्रश्न सोडवण्यासाठी अनेक अडचणी आहेत. त्यावर लोकसभा निवडणुकीनंतर तोडगा काढण्यात येईल, अशी ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज दिली. नाशिक आणि दिंडोरी मतदारसंघातल्या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ चांदवड आणि नाशिक इथं सभा झाल्या. यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यातल्या एक हजार १४७ गावात दुष्काळ जाहिर करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यशासनाने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी दुष्काळी उपाय योजनेतून थकीत विज बिलात ३३ पूर्णांक पाच टक्के सुट देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यतल्या दोन लाख ७४ हजार

४७९ शेतकऱ्यांना, ८६ कोटी १६ लाख ६६ हजार रुपयांची सुट देण्यात आली आहे.

<><><><>

अकोला जिल्ह्यात कृषी विभागाने कपाशी बियाण्याची विक्री सुरू केली आहे. पण दुसऱ्याच दिवशी बाजारपेठेतून बियाणे संपल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. बियाण्यांची पुरेशी पाकिटं मिळत नाहीत. तसंच काही कृषी केंद्रांवर जास्त दराने विक्री होत असल्याची तक्रार शेतकरी करत आहेत.

<><><><>

यंदाचा पावसाळा सुरू व्हायला केवळ १३ दिवसांचा कालावधी उरला आहे. मात्र,अकोला जिल्ह्यात मंजूर १०२ पाणंद रस्ते कामांपैकी १७ मे पर्यंत केवळ ३२ रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. लोकसभा आचारसंहिता लागू झाल्यानंतर पाणंद रस्त्यांची कामे मात्र रेंगाळल्यानं उर्वरित रस्त्यांची कामं पूर्ण कधी होणार, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

<><><><>

विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणाऱ्या I Do-We Do-you Do या नवीन अध्यापन पद्धतीवर, वाशीम जिल्ह्यातल्या जिजामाता विद्यामंदिर अनसिंग इथले उपक्रमशील शिक्षक ललित भुरे यांनी संशोधन केलं आहे. या पध्दतीचा फायदा शिक्षक आणि विद्यार्थ्यांना होणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणाला अनुरूप अशा या नवीन अध्यापन पद्धतीवर शिक्षक ललित भुरे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित होणाऱ्या इंटरनॅशनल ॲडव्हान्स रिसर्च जनरल इन सायन्स इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी या विषयावर पेपरही प्रकाशीत केला.

**<><><><><>**

जागतिक टेबलटेनिस फीडर स्पर्धेत भारतीय जोडी पोयमंती बैसया आणि आकाश यांनी मिश्र दुहेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. त्यांनी स्वदेशी जोडी अनिर्बन घोष आणि स्वस्तिका घोष यांच्यावर चुरशीच्या लढतीत तीन - दोन असा विजय मिळवला.

//<><><><><>//